सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता महत्वाचे रस्ता/रेल्वे / कालवे दुतर्फा वृक्ष लागवड (४४०६ ०४९२) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः सावनि-२०१९ /प्र.क्र.७२ /फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १८ सप्टेंबर २०१९

वाचा :-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक अंदाज-२०१५/ प्र.क्र.३६/ फ-११, दि.१६ जून २०१५
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९.
३) प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) , महाराष्ट्र राज्य , नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष -१/पी/यो/ नबाप्र/प्र.क्र.०८/४१५/२०१९-२०, दि. १८.०६.२०१९
४) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक सावनि-२०१९/ प्र.क्र.७२/ फ-११, दि.०९.०७.२०१९
५) प्रधान मुख्य वनसरंक्षक, (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे पत्र क्रमांक कक्ष -१/चाबा/०७/१९-२०/६८३/२०१९-२०, दि. ११.०७.२०१९
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९
७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक सावनि-२०१९/ प्र.क्र.७२/ फ-११, दि.१६.०७.२०१९
८) प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) , महाराष्ट्र राज्य , नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष -१/पी/यो/ नबाप्र/प्र.क्र.०८/८२५/२०१९-२०, दि. १३.०८.२०१९
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक कक्ष-१/ साव/०७/२०१९-२०/१०६०/२०१८-१९, दि. २६.०८.२०१९
१०) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक सावनि-२०१९/ प्र.क्र.७२/ फ-११, दि.२७.०८.२०१९

प्रस्तावना :-

वन आणि वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरिता राज्य योजनेंतर्गत सन २०१९-२० करीता **"सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम (४४०६ ०४९२)" या योजनेंतर्गत रु. ९४८७५.०० लक्ष इतका निधी** (०२- मजूरी रु. ७५९००.०० लक्ष + २१ पुरवठा व सामुग्री रु. १८९७५.०० लक्ष) अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. त्यापैकी महत्वाचे रस्ते/ कालवे/रेल्वे लाइनच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे या योजनेसाठी ५१०००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित असून त्यापैकी माहे एप्रिल-२०१९ ते डिसेंबर २०१९ पर्यंतच्या ९ महिन्यांच्या कालावधीकरीता वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९ च्या परिपत्रकास अनुसरुन रु.३०६००.०० लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. त्यापैकी दि. १६.०७.२०१९ व दि.२७.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिळून रु. १७०००.०० लक्ष वितरित करण्यात आलेले असून रु१३६००.०० लक्ष वितरणासाठी उपलब्ध आहेत.

३. प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य , नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दि. १८.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये रु. ७०२२५.६८ लक्ष इतका निधी औरंगाबाद, नाशिक , ठाणे, नागपूर , पुणे व अमरावती या ६ सामाजिक वनीकरण वृत्तांसाठी वितरित करण्यासाठी

प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, सदर त्रुटींची पूर्तता करण्यास काही कालावधी लागणार होता तसेच वृक्ष लागवडीची कामे तातडीने पूर्ण होण्यासाठी वनमजुरांना तातडीने मजूरी अदा करणे आवश्यक होते यासाठी रु.१७०००.०० लक्ष निधी संदर्भ क्र.४ व ७ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे.

४. आता ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम अंतर्गत बहूतांशी वृक्ष लागवडीची कामे पूर्ण झालेली आहेत. या सर्व कामांसाठीची देयके तसेच मजूरी अदा करण्यासाठी वित्त विभागाच्या दि. ०८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार अर्थसंकल्पीत रकमेच्या ६०% मर्यादेत उर्वरित रु. १३६००.०० लक्ष निधी त्रुटी पूर्ततेच्या अधीन राहून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

वन व वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरिता सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या "महत्वाचे रस्ते/ कालवे/रेल्वे लाइनच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे (४४०६ ०४९२)" हया योजनेकरिता संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये मागणी केलेल्या रु. ७०२२५.६८ लक्ष रकमेपैकी दि.१६ जूलै २०१९ व २७ ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिळून वितरित करण्यात आलेल्या रु.१७०००.०० लक्ष निधी व्यतिरिक्त उर्वरित रु. १३६००.०० लक्ष **सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे ६ सामाजिक वनवृत्तांसाठी** वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी वितरित करण्यापूर्वी प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी सदर योजनेसाठी, सन २०१८-१९ करिता वितरित केलेला निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली व्यतिरिक्त अन्यत्र ठिकाणी वळती केला नसल्याची खात्री करावी, वृक्ष लागवडीपैकी जिवंत असलेल्या रोपांच्या टक्केवारीनुसार निधी वितरित/निधीचा वापर करण्यात यावा. तसेच संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटींचा संपूर्ण पूर्तता अहवाल शासनास सादर करण्यात येईल या अटींच्या अधीन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.तसेच उक्त नमूद पत्रातील त्रुटींचा पूर्तता अहवाल सादर केल्याशिवाय सदर योजनेसाठीचा उर्वरित निधी वितरित करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

४. सदर निधी खर्च करण्यापूर्वी ज्या प्रकरणी वन परिक्षेत्र अधिकारी/ सहायक वन संरक्षक यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराबाहेर तांत्रिक प्रशासकीय मान्यता दिली आहे अशा प्रकरणी सक्षम अधिकाऱ्यांनी सुधारित तांत्रिक/ प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

५. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे. वितरित

केलेला निधी मंडळे/ महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही.

६. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

७. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनांक ८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. सी-१०
४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च
(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण अंतर्गत
महत्वाचे रस्ते/कालवे/रेल्वे लाईनच्या दुतर्फा वृक्ष लागवड (४४०६ ०४९२)
०२- मजूरी , २१- सामुग्री पुरवठा

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८१३१३४५९२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.09.18 13:28:24 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (मंत्रालय)

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.

१०.निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई

११.वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

१२.कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१३.कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४.उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१५. निवडनस्ती/फ-११.

शासन निर्णय क्रमांक साववि-२०१९/ प्र.क्र.७२ / फ-११, दि. १८ सप्टेंबर, २०१९

सोबतचे विवरणपत्र

मागणी क्र. सी-१०

(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण अंतर्गत

महत्वाचे रस्ते/कालवे/रेल्वे लाईनच्या दुतर्फा वृक्ष लागवड (४४०६ ०४९२)

०२- मजूरी , २१- सामुग्री पुरवठा

(रुपये लाखात)

अ.क्र.	सामाजिक वनीकरण वनवृत्त	विभाग	एकूण मागणी केलेला निधी	वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार वितरणा साठी उपलब्ध निधी	शासन निर्णय दि.१६.०७.२०१९ अन्वये वितरित करण्यात आलेली निधी	शासन निर्णय दि. २७.०८.२०१९ वितरित करण्यात आलेली निधी	याद्वारे वितरित करण्यात आलेली रक्कम
१	**औरंगाबाद**	औरंगाबाद	१९७५.६०	८६०.७७	२३९.००	**२३९.००**	**३८२.७७**
		परभणी	१८८२.८७	८२०.३७	२२८.००	**२२८.००**	**३६४.३७**
		बीड	७५६.२४	३२९.४९	९१.५०	**९१.५०**	**१४६.४९**
		नांदेड	६०९९.४१	२६५७.५१	७३८.००	**७३८.००**	**११८१.५१**
		उस्मानाबाद	२४९२.२९	१०८५.८९	३०१.५०	**३०१.५०**	**४८२.८९**
		जालना	२३३६.५४	१०१८.०३	२८३.००	**२८३.००**	**४५२.०३**
		लातूर	२३९०.१७	१०४१.४०	२८९.००	**२८९.००**	**४६३.४०**
		हिंगोली	३१७०.६३	१३८१.४४	३८३.५०	**३८३.५०**	**६१४.४४**
		एकूण	**२११०३.७५**	**९१९४.९०**	२५५३.५०	**२५५३.५०**	**४०८७.९०**

२	**नाशिक**	नाशिक	३४२१.२५	१४९०.६४	४१४.००	**४१४.००**	**६६२.६४**
		धुळे	११५४.९२	५०३.२०	१३९.५०	**१३९.५०**	**२२४.२०**
		जळगांव	१७२९.३५	७५३.४८	२०९.५०	**२०९.५०**	**३३४.४८**
		अहमदनगर	२२७३.०४	९९०.३६	२७५.००	**२७५.००**	**४४०.३६**
		नंदूरबार	१३९४.२२	६०७.४६	१६८.५०	**१६८.५०**	**२७०.४६**
		एकूण	**९९७२.७८**	**४३४५.१४**	१२०६.५०	**१२०६.५०**	**१९३२.१४**
३	**ठाणे**	ठाणे	२०७६.८	९०४.८६	२५१.५०	**२५१.५०**	**४०१.८६**
		रायगड	१२८२.३	५५८.७०	१५५.००	**१५५.००**	**२४८.७०**
		रत्नागिरी	६२५.६९	२७२.६१	७६.५०	**७६.५०**	**११९.६१**
		सिंधुदूर्ग	१३९.४९	६०.७८	१८.००	**१८.००**	**२४.७८**
		एकूण	**४१२४.२८**	**१७९६.९५**	५०१.००	**५०१.००**	**७९४.९५**
४	**नागपूर**	गोंदिया	६१७.६२	२६९.१०	७५.००	**७५.००**	**११९.१०**
		भंडारा	८३१.६१	३६२.३३	१००.५०	**१००.५०**	**१६१.३३**
		नागपूर	११०९.९	४८३.५८	१३४.५०	**१३४.५०**	**२१४.५८**
		वर्धा	१३००.७३	५६६.७३	१५७.५०	**१५७.५०**	**२५१.७३**
		चंद्रपूर	१२७१.१५	५५३.८४	१५४.००	**१५४.००**	**२४५.८४**
		गडचिरोली	१४२४.११	६२०.४९	१७२.५०	**१७२.५०**	**२७५.४९**
		एकूण	**६५५५.१२**	**२८५६.०७**	७९४.००	**७९४.००**	**१२६८.०७**

५	**पुणे**	पुणे	३८०२.०९	१६५६.५७	४६०.००	**४६०.००**	**७३६.५७**
		सोलापूर	२४२५.८९	१०५६.९६	२९३.५०	**२९३.५०**	**४६९.९६**
		सांगली	१९८८.२५	८६६.२८	२४०.५०	**२४०.५०**	**३८५.२८**
		सातारा	२८१३.४५	१२२५.८२	३४०.५०	**३४०.५०**	**५४४.८२**
		कोल्हापूर	२९३७.३७	१२७९.८१	३५५.५०	**३५५.५०**	**५६८.८१**
		एकूण	**१३९६७.०५**	**६०८५.४४**	१६९०.००	**१६९०.००**	**२७०५.४४**
६	**अमरावती**	अमरावती	२०९१.९१	९११.४५	२५३.००	**२५३.००**	**४०५.४५**
		बुलडाणा	२८८४.७२	१२५६.८७	३४९.००	**३४९.००**	**५५८.८७**
		अकोला	४५६१.३२	१९८७.३७	५५२.००	**५५२.००**	**८८३.३७**
		यवतमाळ	३५४६.१६	१५४५.०६	४२९.००	**४२९.००**	**६८७.०६**
		वाशिम	१४१८.५९	६२०.७५	१७२.००	**१७२.००**	**२७६.७५**
		एकूण	**१४५०२.७०**	**६३२१.५०**	१७५५.००	**१७५५.००**	**२८११.५०**
		एकूण एकंदर	७०२२५.७०	३०६००.००	८५००.००	**८५००.००**	**१३६००.००**